## Hindi Vidya Prachar Samiti's

## Ramniranjan Jhunjhunwala College of Arts, Science & Commerce (Empowered Autonomous College)

**Affiliated to**

**UNIVERSITY OF MUMBAI**

**Syllabus For F.Y.B.A. (level 4.5 under NEP-2020)**
**Program: B.A. MARATHI**
**Program Code: RJMAR**
**Course: Marathi CC**

**Course Code: RJCCMAR111**
**RJCCMAR121**

**Sem.  I &   Sem. II (level 4.5)**
**CBCS**
**Multidisciplinary Degree Program with Multiple entry and Exit (NEP-2020)**

**2026-27**
**2027-28**
**2028-29**

## प्रास्ताविक

## मराठी भाषा आणि मराठी साहित्य का अभ्यासायचं?

मानवी भाषा हे भावना-विचार यांच्या संप्रेषणाचं अत्यंत महत्त्वपूर्ण माध्यम आहे. मातृभाषा ही मानवाला आईच्या गर्भात असल्यापासून अवगत असणारी गोष्ट आहे. जन्माला आल्यापासून आपण भाषा ऐकतो, ती आत्मसात करू लागतो,मग हळू हळू बोलू लागतो. आपल्या रोजच्या जीवनव्यवहारात श्वासाइतकीच भाषेची अपरिहार्य गरज आपल्याला असतोच. कारण माणूस हा समाजप्रिय प्राणी आहे आणि भाषा हे समाजव्यवहाराचं अविभाज्य अंग आहे. त्यामुळे भाषाप्रभुत्व ही यशस्वी जीवनाची गुरुकिल्ली आहे. दैनंदिन व्यवहारापुरता भाषेचा वापर मर्यादित नाही. उत्तम भाषेचा संस्कार हा तुमच्या जगण्याला दिशा देणारा, जीवन घडवणारा असतो. भाषा तुमच्या भावनिक, सांस्कृतिक गरजांचं भरणपोषण करून व्यक्तिमत्त्वविकास घडवते.

भाषेचं हे सामर्थ्य लक्षात घेता,तिचं स्वरूप समजून घेणं, तिचा शास्त्रशुद्ध अभ्यास करणं किती अनिवार्य आहे हे तुमच्या लक्षात येईल.

प्रत्येक समाजाच्या भाषेची अशी काही खास वैशिष्ट्यं असतात..त्या त्या समाजाच्या भाषेमध्ये निर्माण होणारं साहित्य म्हणजे त्या समाजाचा भावनिक उद्गार असतो.त्या समाजातील साहित्य हे मानवी समाजाचं प्रतिबिंब असतं ,असं मानलं जातं. प्रत्येक समाजातील सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक,आर्थिक, भौगोलिक इ. परिस्थितीचा अभ्यास करायचा झाल्यास, त्या समाजात निर्माण झालेल्या साहित्याचा अपरिहार्यपणे आधार घ्यावा लागतो. म्हणजेच, साहित्याच्या अभ्यासाने या सर्व घटकांचं भान येतं,ज्ञान प्राप्त होतं. भाषा आणि साहित्य यांच्या अभ्यासाने आपण ज्ञानसमृद्ध आणि भावसंपन्न होतो.

मराठी भाषेला आणि साहित्याला अकराव्या शतकापासूनची प्रदीर्घ परंपरा आहे.

" माझा मऱ्हाटाची बोलु कवतिके। परि अमृतातेही पैजा जिंके। ऐसी अक्षरे रसिके। मेळवीन॥"

या शब्दांत ज्ञानदेवांनी आपल्या भाषेचं सामर्थ्य व्यक्त केलं . या सामर्थ्याची ओळख आपण अभ्यासक्रमाच्या माध्यमातून करून घेणार आहोत.

## आर.जे.मध्ये मराठी साहित्याचा अभ्यास का निवडायचा?

आपल्या महाविद्यीलयाच्या स्थापनेपासून, म्हणजे १९६३ पासून मराठी विभागही अस्तित्वात आला.. म्हणजेच मराठी विभागाला जवळजवळ ६० वर्षांची परंपरा आहे. मराठी विभागाबरोबरच मराठी वाङ्मय मंडळाचीही स्थापना झाली. विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमाबरोबरीनेच त्यांचा सर्वांगीण विकास घडावा आणि त्यांची वाङ्मयीन अभिरूची सुसंस्कारित व्हावी यांसाठी मराठी विभाग आणि मराठी वाङ्मय मंडळ भाषाविषयक विविध नवनवीन उपक्रमांचं आयोजन करीत असतं. प्रसिद्ध लेखकांची व्याख्यानं, लेखकांशी संवाद साधणाऱ्या मुलाखती, अभ्यासक्रमावर आधारित वृत्तांतलेखन स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, निबंधलेखन स्पर्धा तसंच 'आविष्कार' भित्तिपत्रक व हस्तलिखित व इ-अंक यांचंही आयोजन केलं जातं. मुलाखत तंत्र समजून घेण्यासाठी विद्यार्थ्यांना मुलाखतीची संधी उपलब्ध करून दिली जाते. या व्यतिरिक्त विद्यार्थ्यांसाठी कौशल्यविकसन तसेच मूल्यवर्धित अभ्यासक्रमही मराठी विभागातर्फे घेतले जातात...अ) मराठी युनिकोड टंकलेखन आणि डीटीपी,पेजमेकिंग ब) मराठी शुद्धलेखन आणि मुद्रितशोधन. क) मराठी भाषा आणि मराठी साहित्यातील संवाद आणि मानवी मूल्य. या अभ्यासक्रमांच्या साहाय्याने विद्यार्थ्यांना व्यवसायाच्या दिशा उपलब्ध होऊ शकतात.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसारे मराठी साहित्याच्या अभ्यासक्रमाची आखणी करताना व्यावसायिक उपयोजन, कौशल्य विकसन व विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास ही गरज ओळखून उपयोजित मराठी, मराठी युनिकोड टंकलेखन, मराठी शुद्धलेखन आणि मुद्रितशोधन कार्यालयीन पत्रव्यवहार , अर्जलेखन, वृत्त-वृत्तांतलेखन यांबरोबरच भाषांतर, जाहिरातलेखन, ग्रंथपरीक्षण या घटकांचाही अभ्यासक्रमात समावेश केला आहे.

तृतीय वर्ष कला शाखेच्या अभ्यासक्रमाची आखणी विद्यार्थ्यांना लोकसेवा आयोगाच्या विविध परीक्षांसाठी उपयुक्त होईल,याचे भान ठेवून केली आहे.

विद्यार्थ्यांनी मराठी या विषयाची निवड केल्यास व्यवहारचतुर आणि संवेदनशील व्यक्तिमत्त्व म्हणून विद्यार्थ्यांची जडणघडण होईल, अशी खात्री वाटते.

**पाठ्यपूरक अभ्यासक्रम -Cocurricular Course (CC)**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर देते. पाठ्यपूरक अभ्यासक्रमामधे (CC) आरोग्य आणि कल्याण, योगशिक्षण, खेळ आणि तंदुरुस्ती, सांस्कृतिक उपक्रम, राष्ट्रीय सेवायोजना( NSS)/राष्ट्रीय छात्रसेना(NCC) आणि ललित/ उपयोजित/ दृक्श्राव्य/ सादरीकरणात्म कला हे सगळे विद्यार्थीकेंद्रित उपक्रम समाविष्ट होतात. या उपक्रमांमुळे केवळ विद्यार्थ्यांच्या शारीरिक तंदुरुस्तीची व आरोग्याची काळजी घेतली जात नाही तर त्यांच्या कलागुणांची जोपासना करण्यासाठी आणि त्यांची अभिव्यक्ती करण्यासाठी त्यांना व्यापक संधी व व्यासपीठ उपलब्ध होते. त्यांना स्वतःच्या पलीकडील जगाकडे पाहण्यास आणि त्यांच्या वैयक्तिक गरजांपेक्षा सामाजिक गरजांना प्राधान्य देण्यास शिकण्यासाठी मदत होते. उदयाचे भविष्य असणाऱ्या आजच्या तरुणांच्या व्यक्तित्वविकासाच्या आणि चारित्र्यनिर्मितीच्या प्रक्रियेत मदत करते.

(राष्ट्रीय शैक्षणिक योजना( NEP) दस्तऐवजानुसार)

| | | |
|---|---|---|
| SEMESTER | : | I & II |
| CATEGORY UNDER NEP | : | Marathi CC |
| TITLE OF THE SUBJECT/COURSE | : | Marathi- Cocurricular Course |
| COURSE CODE | : | RJCCMAR111 & RJCCMAR121 |
| CREDITS | : | 02 |
| DURATION | : | 30 Hours |

| **F.Y.B.A.**<br>**प्रथम वर्ष**<br>**कला शाखा** | **Marathi CC**<br>**मराठी पाठ्यपूरक अभ्यासक्रम** |
|---|---|
| **अभ्यासपत्रिकेची उद्दिष्टे (Learning Objective):** | |
| १. | विद्यार्थ्यांनी मराठीच्या अभ्यासक्रमाशी संबंधित लेखन कौशल्ये व विविध कौशल्यांचे प्रत्यक्ष उपयोजन करण्यास शिकावे. |
| २. | साहित्याची आस्वादक्षमता व आकलनक्षमता वाढावी आणि साहित्याविषयी आस्था निर्माण व्हावी. |
| ३. | नेतृत्वगुण, संघभावना, उपक्रमशीलता यांसारखे गुण वाढीस लागून विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्व विकास व्हावा. |
| ४. | विद्यार्थ्यांनी अन्य महाविद्यालयातील उपक्रमांमध्ये सहभागी होऊन एकूण सहयोग भावना वाढत जावी आणि त्यांना शैक्षणिक क्षेत्रातील मराठी भाषा व साहित्य विषयाबाबतील वातावरणाचे भान येणे. |
| ५. | विद्यार्थ्यांची भाषा व साहित्याशी संबंधित अनेक सांस्कृतिक व्यवहारांशी ओळख व्हावी. |
| ६. | विद्यार्थ्यांना साहित्याशी संबंधित अन्य कलांची जोपासना करता येऊन बहुसांस्कृतिकतेचे भान यावे. |
| ७. | विद्यार्थ्यांमधे सामाजिक संवेदनशीलता वाढीस लागावी. |

| **CO No.**<br><br>**निष्पत्ती क्र.** | **अभ्यासपत्रिकेची निष्पत्ती (Course Outcome):** | **PSO Addressed** | **BLOOMS LEVEL** |
|---|---|---|---|
| १. | विद्यार्थी मराठीच्या अभ्यासक्रमाशी संबंधित लेखन कौशल्ये व विविध कौशल्यांचे प्रत्यक्ष उपयोजन करण्यास शिकतील. | 9,10 | BT Level I, II, III, VI<br>Remember, Understand, Apply, Create |
| २. | साहित्याची आस्वादक्षमता व आकलनक्षमता वाढेल आणि साहित्याविषयी आस्था निर्माण होईल. | 1,2 | BT Level I, II, III,IV, VI<br>Remember, Understand, Apply, Analyze, Create |
| ३. | नेतृत्वगुण, संघभावना, उपक्रमशीलता यांसारखे गुण वाढीस लागून विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्व विकास होईल. | 12 | BT Affective Domain level I, II, III, IV<br>Receiving, responding, Valuing, organizing |
| ४. | विद्यार्थी अन्य महाविद्यालयातील उपक्रमांमध्ये सहभागी होतील व एकूण सहयोग भावना वाढत जाईल आणि त्यांना शैक्षणिक क्षेत्रातील मराठी भाषा व साहित्य विषयाबाबतील वातावरणाचे भान येईल. | 5,7,8 | BT Level I, II<br>Remember, Understand<br><br>BT Affective Domain level I, II, III, IV<br>Receiving, responding, Valuing, organizing |
| ५. | विद्यार्थ्यांची भाषा व साहित्याशी संबंधित अनेक सांस्कृतिक व्यवहारांशी ओळख होईल. | 5,7,8 | BT Level I, II<br>Remember, Understand |
| ६. | विद्यार्थ्यांना साहित्याशी संबंधित अन्य कलांची जोपासना करता येऊन बहुसांस्कृतिकतेचे भान येईल. | 8 | BT Level I, II, III, VI<br>Remember, Understand, Apply, Create<br><br>BT Affective Domain level I, II, III, IV<br>Receiving, responding, Valuing, organizing |
| ७. | विद्यार्थ्यांमधे सामाजिक संवेदनशीलता वाढीस लागेल. | 11,12 | BT Affective Domain level I, II, III, IV<br>Receiving, responding, Valuing, organizing |

| सत्र १ आणि सत्र- २ | | तास H | श्रेयांक Cr |
|---|---|---|---|
| **मराठी पाठ्यपूरक अभ्यासक्रम** | **RJCCMAR111 & RJCCMAR121** | **३०** | **०२** |

विद्यार्थ्यांनी पुढील चार गटातील कोणत्याही उपक्रमांमधे सहभागी होऊन अपेक्षित तीस अध्ययन तास पूर्ण करावेत आणि या अभ्यासक्रमाची अपेक्षित उद्दिष्टे साध्य करावीत.तथापि मराठी विषयाशी संबंधित विविध उपक्रमांमधे विद्यार्थ्यांनी अधिकाधिक सहभागी व्हावे व त्यासाठी त्यांना प्रोत्साहित केले जाईल.

***गट- १***

१. राष्ट्रीय सेवायोजना( NSS)/राष्ट्रीय छात्रसेना(NCC)/ आजीवन अध्ययन आणि विस्तार विभाग(DLLE)/ सफाई बँक SAFAI BANK/ SES- REC/ रोटरॅक्ट (ROTARACT) यासारख्या विद्यापीठाच्या/ विद्यापीठ अनुदान आयोगाच्या/अधिकृत सेवाविस्तार उपक्रमांतर्गत किंवा सरकारी योजनेअंतर्गत गठित विभांगाद्वारे चालविले जाणारे उपक्रम .
२. तसेच क्रीडा (SPORTS)/ सांस्कृतिक विभाग(CULTURAL)/ NATURE CLUB यांसारख्या महाविद्यालयाच्या विभागांद्वारे चालविले जाणारे उपक्रम.

***गट- २***

**१. मराठी विभागातर्फे घेतल्या जाणाऱ्या स्पर्धा-**

वृत्तांतलेखन,वक्तृत्व, गीतगायन, साहित्यचित्रवेध, काव्य सादरीकरण, निबंधलेखन इत्यादींमधे सहभाग, तसेच पारितोषिक मिळविणे.

**२. मराठी विभागातर्फे घेतले जाणारे उपक्रम-**

कथारंग, आविष्कार भित्तिपत्रक, हस्तलिखित, मराठी भाषा दिवस, मराठी भाषा संवर्धन पंधरवडा, ग्रंथदिंडी, पुस्तकगप्पा, पुस्तक प्रदर्शने, मुलाखत इत्यादींमधे सहभाग.

**३. जुगलदास मोदी आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा व इतर कार्यक्रमाच्या आयोजनात योगदान.**

**४. क्षेत्रभेट/ शैक्षणिक सहल.**

| |
|---|
| **५. वेळोवेळी आयोजित होणारे इतर प्रासंगिक कार्यक्रम.**<br>**६. विद्यार्थ्यांसाठी आयोजित केल्या जाणाऱ्या कार्यशाळा/ चर्चासत्रे/ परिसंवाद यातील सहभाग.** |
| ***गट -३*** |
| १. मराठीशिवाय इतर विभागांनी आयोजित केलेल्या स्पर्धा किंवा उपक्रम यांतील सहभाग आणि पारितोषिक.<br>२. इतर महाविद्यालयांनी आयोजित केलेल्या आंतरमहाविद्यालयीन स्पर्धा किंवा उपक्रम यांतील सहभाग आणि पारितोषिक. |
| ***गट -४*** |
| १. अनन्य साधारण उपक्रमांतील सहभाग.(Out of the Box Activity)<br>अ. लेखन व प्रकाशन:<br>१. महाविद्यालयाचा हार्मनी वार्षिकांक किंवा अन्य ठिकाणी लेखन व प्रकाशन.<br>२. मराठीतील नियतकालिके, वर्तमानपत्रे यांत लेखन.<br>आ. साहित्याशी संबंधित ललित/उपयोजित/दृक्श्राव्य/सादरीकरणात्म कलेमधे स्वतंत्र रचना.<br>इ.मराठी भाषेच्या जतन/अभिवृद्धी/प्रसार या संबंधित कार्य अभिनव कल्पना.<br>ई. मराठीतील दुर्मिळ ग्रंथांचे जतन/ डिजिटलायझेशन या संबंधी कार्य.<br>.<br>२. योगशिक्षण, आरोग्य आणि कल्याण, जीवन कौशल, आत्मभान कार्यक्रम (SAP) यांसारख्या कोणत्याही मूल्यवर्धन अभ्यासक्रमातील सहभाग. |

**F.Y.B.A. SEM – I & II**

**प्रथम वर्ष कला शाखा सत्र १**

**मराठी पाठ्यपूरक अभ्यासक्रम (CC) (RJCCMAR111 & RJCCMAR111)**

**मूल्यमापन**

**मूल्यमापन योजना :**

१. प्रत्येक विद्यार्थ्याला पाठ्यपूरक उपक्रम नोंदपुस्तक(CC - BOOK) दिले जाईल.
२. विद्यार्थ्यांनी नोंदपुस्तिकेत प्रत्येक उपक्रम व त्यातील स्वतःच्या सहभागाचा सारांश लिहिवा. योग्य त्या प्रमाणपत्रांच्या प्रती जोडव्यात.
३. सत्राअखेरीस पाठ्यपूरक अभ्यासक्रमाच्या मूल्यमापनासंदर्भात मुलाखतवजा तोंडी परीक्षा घेतली जाईल. तेव्हा नोंदपुस्तिका व पाठ्यपूरक उपक्रमांतील सहभागाशी संबंधित सर्व प्रमाणपत्रांच्या प्रती, प्रकाशित साहित्य, लेखनसाहित्य, छायाचित्रे, ध्वनिचित्रफीत इत्यादींसह उपस्थित राहावे.

**मूल्यमापन सारणी पुढीलप्रमाणे-**

| गट १<br>(५-१० गुण) | गट २<br>(५-१० गुण) | गट ३<br>(५-१० गुण) | गट ४<br>(५-१० गुण) | तोंडी परीक्षा/<br>मुलाखत<br>(५-१० गुण) |
|---|---|---|---|---|
| | | | | |

## गट १

*राष्ट्रीय सेवायोजना( NSS)/राष्ट्रीय छात्रसेना(NCC)/ आजीवन अध्ययन आणि विस्तार विभाग(DLLE)/ सफाई बँक SAFAI BANK/ SES- REC/ रोटरॅक्ट (ROTARACT)

*क्रीडा (SPORTS)/ सांस्कृतिक विभाग(CULTURAL)/ NATURE CLUB यांसारख्या महाविद्यालयाच्या विभागांद्वारे चालविले जाणारे उपक्रम.

## गट २

*मराठी विभागातर्फे घेतल्या जाणाऱ्या स्पर्धा, उपक्रम

*जुगलदास मोदी आंतरमहाविद्यालयीनवक्तृत्व स्पर्धा व इतर कार्यक्रमाच्या आयोजनात योगदान. *क्षेत्रभेट/ शैक्षणिक सहल. वेळोवेळी आयोजित होणारे इतर प्रासंगिक कार्यक्रम.

*विद्यार्थ्यांसाठी आयोजित केल्या जाणाऱ्या कार्यशाळा/ चर्चासत्रे/ परिसंवाद यातील सहभाग.

## गट ३

*मराठीशिवाय इतर विभागांनी आयोजित केलेल्या स्पर्धा किंवा उपक्रम यांतील सहभाग आणि पारितोषिक.

*इतर महाविद्यालयांनी आयोजित केलेल्या आंतरमहाविद्यालयीन स्पर्धा किंवा उपक्रम यांतील सहभाग आणि पारितोषिक.

## गट ४

*अनन्य साधारण उपक्रमांतील सहभाग.

**(Out of the Box Activity)**


अ. लेखन देव प्रकाशन- हार्मनी, नियतकालिके इ.मधे

आ.साहित्याशी संबंधित ललित/उपयोजित/ दृक्श्राव्य/ सादरीकरणात्म कलेमधे स्वतंत्र रचना

इ.मराठी भाषेच्या जतन/अभिवृद्धी/प्रसार या संबंधित कार्य अभिनव कल्पना.

ई.मराठीतील दुर्मिळ ग्रंथांचे जतन/ डिजिटलायझेशन या संबंधी कार्य.

*योगशिक्षण, आरोग्य आणि कल्याण, जीवन कौशल, आत्मभान कार्यक्रम (SAP) यांसारख्या कोणत्याही मूल्यवर्धन अभ्यासक्रमातील सहभाग.


IV
SELF AWARENESS PROG./ COMMUNITY ENGAGEMENT PROG / SOCIETAL OUTREACH PROG
ANY OTHER ACTIVITY
HEALTH AND WELLNESS
YOGA EDUCATION
JEEVAN KAUSHAL
I
NCC/ NSS/ DLLE/ SPORTS/ CULTURAL/ SAFAI BANK/ SES- REC/ NATURE CLUB/ ROTARACT- REGISTRATION AND PARTICIPATION IN ACTIVITIES.
PARTICIPATION IN ACTIVITIES OF OTHER DEPARTMENTS AND INTER COLLEGIATE EVENTS WITH CERTIFICATE TO SUPPORT THE SAME.
PARTICIPATION IN DEPARTMENTAL ACTIVITIES/ DEPARTMENTAL FESTIVALS/ SIGNATURE ACTIVITIES OF THE DEPT AND CERTIFICATE TO SUPPORT THE SAME.
II
III